# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१७

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक १७ मार्च, २०१७ / फाल्गुन २६, १९३८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **आदिवासी विकास मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **उद्योग व खनिकर्म मंत्री** | |
| **(३)** | **ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | |
| **(४)** | **सामाजिक न्याय आणि विशेष सहाय्य मंत्री** | |
| **(५)** | **सहकार, पणन आणि वस्त्रोद्योग मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

**मौजे आमखेड (ता.चिखली, जि.बुलढाणा) येथे नविन रोहित्र बसविण्याबाबत**

**(१) * ८०३५६ श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आमखेड (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावातील पुर्व भागातील रोहित्रावरुन पुर्ण दाबाने विदयुत पुरवठा होत नसल्याने मागील अनेक वर्षांपासुन ग्रामस्थांकडून रोहित्र बसविण्याची मागणी होत असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच बुलडाणा जिल्हयामध्ये मागील चार वर्षांपासून विविध ठिकाणी मागणी करुनही विदयुत कंपनीने रोहित्रे न बसविल्याने शेतक-यांनी काही ठिकाणी मोर्चे काढून आंदोलन केले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन नविन रोहित्र बसविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.

माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील मेहकर तालुक्यात शेतकऱ्यांनी नेमतापूर शिवारात नवीन रोहित्रांसाठी उपविभागीय कार्यालय, मेहकर येथे आंदोलन केले होते. त्याची दखल घेऊन नेमतापूर शिवारात नविन १०० के.व्ही.ए क्षमतेच्या रोहित्रांच्या कामाचे अंदाजपत्रक विदर्भ व मराठवाडा कृषीपंप वीज जोडणी योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आले व या कामास प्राधान्य देण्याच्या दृष्टीने कंत्राटदारास महावितरण कंपनीकडून कार्यादेश देण्यात आले आहेत. सदरचे काम प्रगतीपथावर आहे.
(३) ग्राहकांची मागणी व प्रत्यक्ष विद्युतभार लक्षात घेऊन बुलढाणा जिल्ह्यामध्ये सन २०१४-१५ मध्ये १७१ रोहित्र, सन २०१५-१६ मध्ये ५५९ रोहित्र व सन २०१६-१७ मध्ये २४८ रोहित्र असे एकूण ९७८ नविन वितरण रोहित्र बसविण्यात आले आहेत. तसेच दिनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजने अंतर्गत ३३/११ केव्हीची आठ नवीन उपकेंद्रे, १७० नविन रोहित्र व एकात्मिक ऊर्जा विकास योजने अंतर्गत ३३/११ केव्हीची ३ नवीन उपकेंद्र, ४७ नवीन रोहित्र मंजूर असून निवीदा प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर रोड (जि.ठाणे) परिसरातील पंखाडा आदिवासी पाड्याकडे जाण्याकरिता रस्ता बांधण्याबाबत

**(२) * ८०९६९ श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.नरेंद्र महेता (मिरा भाईंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील घोडबंदर रोड व परिसरातील संजय गांधी उद्यानाच्या पायथ्याशी असलेल्या पंखाडा आदिवासी पाड्याकडे जाण्याकरिता रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाच्या विशेष निधीतून निधी मंजूर करून घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याच्या कामाच्या निविदा मंजुरीच्या नस्तीवर अतिरिक्त आयुक्त यांनी रस्त्याची आवश्यकता नसल्याचा अभिप्राय दिल्यामुळे रस्त्याचे काम प्रलंबित असल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर रस्त्याला राज्य शासनाने मंजुरी देऊन निधी दिला असतानाही सदर आदिवासी पाड्यात रस्ता न बांधण्याची कारणे काय आहेत व याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, त्यात काय आढळून आले व सदर रस्ता उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

ठाणे महानगरपालिका क्षेत्रात “प्राथमिक सुखसोयी विकासासाठी महाराष्ट्र राज्य शासनाचे विशेष अनुदान” या योजनेअंतर्गत दिनांक १२.०२.२०१६ रोजी जिल्हास्तरीय समितीने सदर कामास मान्यता दिलेली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

रस्त्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पुर्ण झाली असून स्थायी समितीच्या मान्यतेनंतर कामास कार्योदेश देण्यात येणार आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्हयात ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत कामे सुरू करण्याबाबत

**(३) * ७५९५१ श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील आदिवासी दुर्गम भागातील रस्ते, नाले, पाण्याची समस्या दूर करण्यासाठी आदिवासी विभागाच्यावतीने ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत सन २०१५-१६ मध्ये २ कोटी ८५ लाख रूपयांच्या रक्कमेच्या प्रस्तावित केलेल्या ३८ कामांना अप्पर आयुक्तांनी मंजूरी देवूनही अद्यापी कामे सुरू झालेली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू कामे सुरू न होण्याची कारणे काय आहेत,

(३) तसेच सदरहू कामांना सुरूवात न झाल्यामुळे आर्थिक वर्षअखेर सदरहू कामांसाठी मंजूर करण्यात आलेला २ कोटी ८५ लाखांचा निधी परत जाण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, ठक्कर बाप्पा योजनेंतर्गत मंजूर झालेली कामे त्वरीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे नाही.

सन २०१५-१६ मध्ये एकूण ११३ कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यापैकी ६० कामे पूर्ण झालेली आहेत व ५३ कामे प्रगतीपथावर आहेत.

सन २०१६-१७ मध्ये एकूण ५८ कामे मंजूर असून त्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून सदर कामे सुरु करण्यात येत आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली येथील वसंतदादा शेतकरी सहकारी बँक गैरव्यवहाराप्रकरणी मालमत्ता जप्तीची कारवाई पूर्ण करण्याबाबत

**(४) * ८१३४६ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली येथील वसंतदादा शेतकरी सहकारी बँकेच्या २४८ कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणी माजी संचालक, त्यांचे वारसदार व माजी अधिकाऱ्यांच्या मालमत्ता जप्तीची कारवाई संथगतीने सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संबंधीत दोषींनी आपल्या नावांवरील मालमत्ता इतरांना विकली किंवा हस्तांतरीत केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून जप्तीची कारवाई पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही,
(२) व (३) बँकेच्या आजी/माजी संचालक (मयत संचालकांचे वारसदार) व अधिकारी यांच्या विरुध्द आरोप निश्चित करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ व त्याखालील नियम ७२ (३) अन्वये दि.०९.०८.२०१६ रोजी संबंधित ४० जबाबदारांवर आरोपपत्र बजावण्यात आले आहे.

आरोप ठेवलेल्या व्यक्तींपैकी काहींनी त्यांचे नावे असलेल्या अगर वारसा हक्काने प्राप्त झालेल्या स्थावर, जंगम मिळकती वितरीत करीत असल्याचे निदर्शनास आल्याने प्राधिकृत चौकशी अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ८८ व ९५ मधील तरतुदीन्वये २८ जबाबदारांचे मिळकती जप्तीबाबत दि. ११.०१.२०१७ रोजी आदेश पारित केलेले आहेत. सदर आदेश उपलब्ध स्थावर मालमत्तेवर हस्तांतरण मनाई व जप्ती नोंद करणेकरिता पोहच केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सांगली जिल्हयातील १८ हजार ८८० ग्राहकांच्या वीज जोडण्या प्रलंबित असल्याबाबत**

**(५) * ८०९८० श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्हयातील शेती पंप, घरगुती व्यापारी आणि औद्योगिक प्रकारातील १८ हजार ८८० ग्राहकांनी वीज जोडणीसाठी महावितरणकडे सन २०१२ पासून शुल्क भरुन मागणी केली असूनही सदर जोडण्या अद्याप प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त जोडण्यांसाठी महावितरणला खांब, तारांकरिता १३४ कोटी २३ लाख रुपयांची आवश्यकता असून सदर रक्कम मा.ऊर्जामंत्री यांनी वर्षभरात तीनदा घोषणा करुनही अद्याप प्राप्त झाली नाही, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्हयात पाणी उपलब्ध असूनही केवळ महावितरणकडून वीज जोडणी मिळत नसल्याने पिकांचे नुकसान होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

सांगली जिल्ह्यांतर्गत सन २०१२ पासून शेतीपंपाचे १२८७९ तसेच घरगुती, व्यापारी व औद्योगिक प्रकारातील ७१५४ असे एकूण २०,०३३ ग्राहक शुल्क भरुन प्रलंबित आहेत.

(२) सांगली जिल्ह्यात २७४३८ कृषीपंपाना वीज पुरवठा करण्यासाठी लागणारा रु. २६६.३३ कोटी इतक्या निधीचा समावेश उर्वरित महाराष्ट्रातील शेतीपंपांचे ऊर्जीकरण करण्यासाठीच्या प्रस्तावित योजनेत समावेश आहे. तसेच, सन २०१६-१७ सालाकरिता घरगुती, व्यापारी व औद्योगिक प्रकारातील जोडण्यांकरिता विशेष घटक योजनेंतर्गत रु. ४.८० कोटी, सामान्य विकास योजनेंतर्गत २.४० कोटी व सामान्य विकास व पध्दती सुधारणा अंतर्गत रु. ४ कोटींची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे व कामे प्रगतीपथावर आहेत.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वसई तालुक्यातील (जि.पालघर) वीज ग्राहकांना वीज देयके मीटर वाचनाच्या छायाचित्राविना देण्यात येत असल्याबाबत

**(६) * ७७६९२ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई तालुक्यातील (जि.पालघर) वीज ग्राहकांना महावितरण कंपनीकडुन घरगुती वीज देयके ही मीटर वाचनाच्या छायाचित्राविना तसेच वेळेवर घरपोच देण्यात येत नसल्याचे बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच ग्राहकांना महावितरण कंपनीतर्फे वीज देयके वेळेत न पाठविणे, चुकीचे वाचन करुन जादा रकमेची देयके पाठविण्यात येत असल्यामुळे येथील नागरिकांनी महावितरणच्या संबंधित कार्यालयात लेखी तक्रार देवूनही अद्याप त्याची दखल घेण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यामध्ये जादा रकमेची वा चुकीची देयके पाठविणा-या संबंधित अधिकारी, कर्मचारी यांचेविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) इन्फ्रा रेड (आय. आर) व रेडिओ फ्रिक्वेन्सी (आर.एफ) तंत्रज्ञानावर आधारित मीटरचे रिडिंग हॅण्ड हेल्ड युनिट (एच.एच.यु.) या उपकरणाद्वारे घेतले जात असल्यामुळे त्याचे फोटो बिलावर येत नाहीत.तसेच काही ग्राहकांचे मीटर वाचन हे मोबाईल ॲप मधून घेण्याची सुरुवात माहे सप्टेंबर, २०१६ पासून केली असून, वसई मंडळात सप्टेंबर, २०१६ ते जानेवारी, २०१७ या सुरुवातीच्या कालावधीत फोटो डाऊनलोड न झाल्यामुळे २७.३२% ग्राहकांची वीज बिले फोटोविना देण्यात आलेली आहेत. तथापि, त्यांचे मीटर वाचन बरोबर झालेले असून, त्यानुसार वीज बिले देण्यात आलेली आहेत. तसेच ग्राहकांना महावितरण कंपनीकडून वीज बिले घरपोच देण्यात येतात.

(२) हे खरे नाही.

महावितरण कंपनीकडील प्राप्त तक्रारीची दखल घेऊन वीज बिले त्वरीत दुरुस्त करण्यात आलेली आहेत. वसई मंडळामध्ये एकूण ७,२४,१५२ इतके ग्राहक असून तक्रारीचे प्रमाण सुमारे २.७८% आहे. माहे सप्टेंबर, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७ पर्यंत एकूण २०,१७१ वीज बिले दुरुस्ती करण्यात आलेली आहेत.

(३) चुकीच्या विद्युत बिलासाठी संबंधित मीटर वाचन ठेकेदारांवर सन २०१६-१७ या वर्षी डिसेंबर, २०१६ अखेर रु. २०,०८,७९२ इतकी दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अकोला येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील अक्षय केमिकल्स कारखान्यास लागलेल्या आगीबाबत**

**(७) * ७५८६०    श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे वसाहतीतील फेज क्र.४ मध्ये अक्षय केमिकल्स कारखान्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास मोठी आग लागली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर आग विझवण्यासाठी स्थानिक महाराष्ट्र औद्योगिक महामंडळ वसाहतीमध्ये फायर ब्रिगेड व फायर हायड्रन्ट्ची यंत्रणा नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एम.आय.डी.सी मध्ये अग्नी प्रतिबंधक योजनेसाठी सतत मागणी असताना त्याचेकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी सदर औद्योगिक वसाहतीत अग्निशामक यंत्रणा कार्यान्वित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) होय. हे खरे आहे.
(२) अकोला औद्योगिक क्षेत्रांत महामंडळामार्फत अग्निशमन केंद्र प्रस्थापित केलेले नाही परंतु अकोला औद्योगिक क्षेत्रांतील टप्पा क्रं. ४ (विकास केंद्र) येथे ०९ फायर हायड्रन्ट व ०१ स्टँडपोस्ट उपलब्ध आहे.
(३) व (४) हे खरे नाही.

अकोला औद्योगिक क्षेत्रांतील उद्योजकांकडून सतत होत असलेल्या अग्निशमन केंद्राच्या मागणीवर संचालक मंडळाच्या बैठकीत विचारविनिमय करुन महामंडळामार्फत अकोला औद्योगिक क्षेत्रांत सुसज्ज असे बी-टाईप अग्निशमन केंद्र बांधून कार्यान्वित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. अग्निशमन केंद्र बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजुर करण्यात आला असून अग्निशमन केंद्रासाठी भूखंडही निश्चित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**देवरी, सालेकसा, आमगांव (जि.गोंदिया) येथे मुला-मुलींच्या निवासासाठी शासकीय आश्रमशाळा सुरू करण्याबाबत**

**(८) * ७९१०९ श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) देवरी, सालेकसा, आमगांव (जि. गोंदिया) येथे समाजकल्याण विभागाने मुला-मुलींच्या, विद्यार्थ्यांच्या निवासासाठी शासकीय आश्रमशाळा सुरू करण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री (सामाजिक न्याय) यांच्याकडे दिनांक १६ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) देवरी, सालेकसा, आमगांव (जि. गोंदिया) येथे समाजकल्याण विभागाने मुला-मुलींच्या, विद्यार्थ्यांच्या निवासासाठी शासकीय आश्रमशाळा सुरू करण्याबाबतचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे दि. १६/०५/२०१६ चे पत्र शासनास प्राप्त झाले असून सदर प्रकरणी आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रचलित नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनीच्या प्रादेशिक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(९) * ७५९७२ श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय सावकारे (भुसावळ), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीने ग्राहकांच्या तक्रारी व अडचणींचे जलद निराकरण व्हावे यासाठी नागपूर, औरंगाबाद, पुणे व कोकण येथे नवीन प्रादेशिक कार्यालये कार्यरत केली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रादेशिक कार्यालयांना आवश्यक असलेला अधिकारी व कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात आलेला नसल्याने वीज ग्राहकांच्या तक्रारीची दखल घेतली जात नसून तेथील साडेदहा हजार पदे रिक्त आहेत व सदर कार्यालयांमध्ये संचालकांचे पद वगळता सर्व पदांवर अद्याप पूर्णवेळ अधिकारी नेमण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक कार्यालयांना आवश्यक असलेला अधिकारी व कर्मचारी वर्ग तात्काळ उपलब्ध करुन न देण्याची कारणे काय आहेत,

(४) सदर पदे तात्काळ भरुन जनतेच्या तक्रारींचे निराकरण होण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली तसेच कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महावितरण कंपनीने वीज वितरण व्यवस्था सुरळीत व परिणामकारकरित्या रहावी व अखंडीत वीज पुरवठा करण्याचे ध्येय साध्य होण्यासाठी क्षेत्रीय स्तरावर अधिक परिणामकारक यंत्रणा निर्माण व्हावी या उद्देशाने व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने कल्याण, पुणे, नागपूर व औरंगाबाद या ठिकाणी कंपनी अंतर्गत प्रादेशिक कार्यालय दि. ०२.१०.२०१६ पासून निर्माण करण्यात आले आहे.

ग्राहक तक्रार नोंदणी व निवारणासाठी महावितरणची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित असून, त्या यंत्रणेव्दारे ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण तत्परतेने करण्यात येते.

(२) प्रादेशिक कार्यालयातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) रिक्त पदे सरळसेवा भरतीव्दारे व कंपनीच्या बदली धोरणानुसार भरण्यात येत आहे.

(४) वर नमूद केल्याप्रमाणे ग्राहक तक्रार नोंदणी व निवारण्यासाठी महावितरणची स्वतंत्र यंत्रणा कार्यान्वित असून, त्या यंत्रणेव्दारे ग्राहकांच्या तक्रारीचे निवारण तत्परतेने करण्यात येत आहे.

-----------------

## मेंढा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथील रवींद्रनाथ टागोर निवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्याचा झालेला मृत्यू

**(१०) * ८१७९५ श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेंढा (ता.तिरोडा, जि.गोंदिया) येथील रवींद्रनाथ टागोर निवासी आश्रमशाळेतील बेपत्ता असलेल्या इयत्ता आठवीच्या रविंद्र चैतराम टेकाम (१४) या विद्यार्थ्याचा दिनांक २९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास मृतदेह विहीरीत आढळून आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उक्त दुर्घटनेची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्याअनुषंगाने विद्यार्थ्याच्या मृत्यूस जबाबदार असलेल्या आश्रमशाळा व्यवस्थापनावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) प्रकल्प कार्यालय, देवरी यांचे स्तरावरुन सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आलेली आहे.

(३) सदर अनुदानित आश्रमशाळेचे अधीक्षक श्री.बावनथडे यांना निलंबीत करण्यात आले असून त्यांचेविरुध्द आश्रमशाळा संहिता नियमानुसार विभागीय चौकशी

करुन कार्यवाही करण्याबाबत संस्थेस कळविण्यात आले आहे. तसेच माध्यामिक मुख्याध्यापक श्री.व्ही.आर.बघेले यांच्या दोन वार्षिक वेतनवाढी शाळा व्यवस्थापनाने रोखल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील पूर्णा गावाबाहेरील पांगरा ढोणे रोडवरील वसतिगृहातील विद्यार्थीनीवर झालेला अत्याचार

**(११) * ८१०७६ श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील पूर्णा गावाच्या बाहेरील पांगरा ढोणे रोडवरील शासकीय वसतिगृहातील १७ वर्षीय मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना दिनांक ०५ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार सदर विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्यावर तसेच वसतिगृहाच्या व्यवस्थापकावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) दि. ०४/०२/२०१७ रोजी पिडीत मुलीने पोलीस स्टेशन पुर्णा येथे समक्ष उपस्थित राहून लेखी तक्रार दिल्याने रजि. नं. २९/२०१७ कलम ३७६,३२३,५०६ भा.दं.वि. सह कलम 34 पोस्को व (3) 1 (w) अनुसूचित जाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून उपविभागीय अधिकारी पुर्णा यांच्यामार्फत पुढील तपास चालु आहे.

(3) सदरील पिडीत मुलगी दि. 3 फेब्रुवारी, 2017 रोजी सकाळी कॉलेजला जात असल्याची नोंद नोंदवहीवर करुन गेली होती. वसतिगृहात येण्याची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत आहे. सायंकाळी 6 वाजल्यानंतर सदरील पिडीत विद्यार्थीनी वसतिगृहात आली नसल्याने वसतिगृह गृहपालांनी तिच्या पालकांशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधुन विचारणा केली असता सदरील मुलगी

पालकांसोबत असल्याचे सांगण्यात आलेले आहे. त्यामुळे वसतिगृह गृहपाल दोषी आढळून येत नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सिकेपी बँकेत झालेल्या ८५ कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत**

**(१२) * ७३८९७ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर, (मुंबई) येथील सिकेपी बँकेत तब्बल ८५ कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सहकार आयुक्तांनी संचालक मंडळ बरखास्त करुन त्यावर प्रशासक नियुक्त केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी भावेश ॲण्ड असोसिएट्स यांच्या माध्यमातून करण्यात आलेल्या चौकशीत अपहारास जबाबदार असणाऱ्या संचालकांविरोधात गुन्हा दाखल करण्यास दूर्लक्ष केल्याप्रकरणी भावेश ॲण्ड असोसिएट्स यांना काळ्या यादीत टाकून पुढील कारवाई करण्याबाबत जिल्हा विशेष लेखा परिक्षक सहकारी संस्था यांना दिलेल्या आदेशानुसार दिनांक २३ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात आर्थिक गुन्हे शाखेत बँकेच्या संचालकांविरोधात तक्रार दाखल करुनही अद्याप पुढे कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संचालक मंडळावर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) अंशत: खरे आहे,

रिझर्व्ह बँकने दि सीकेपी को ऑप बँक लि. मुंबई या बँकेचे संचालक मंडळ निष्प्रभावित करणेबाबत दि.२३.०४.२०१२ रोजी सहकार आयुक्त कार्यालयास सुचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने सहकार आयुक्त कार्यालयाने दि.०७.०५.२०१२ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ११०

अे (१) (iii) नुसार प्रशासक मंडळ नियुक्त केले होते. सध्या सदर बँकेचे सन २०१५-१६ ते २०२१ या कालावधीसाठी संचालक मंडळाची निवडणूक होऊन संचालक मंडळ कामकाज करत आहे.

(२) मे. भावेश अॅण्ड असोसिएट्स यांनी सादर केलेल्या अहवालातील गंभीर बाबी विचारात घेता त्यांना एफ.आय. आर. दाखल करण्याबाबत दि. १६.१.२०१३ रोजी सुचित केले होते. परंतु, त्यांनी सदरचा गुन्हा दाखल न केल्या कारणाने त्यांना लेखापरिक्षण तालिकेतून कमी करण्यात आले आहे. सदर विशेष अहवालातील गंभीर बाबींच्या अनुषंगाने विशेष लेखापरिक्षक, वर्ग-२ यांनी दि. सी.के.पी. को. ऑप. बँकेचे तत्कालीन अध्यक्ष, संचालक मंडळ व जनरल मॅनेजर अशा एकूण २३ व्यक्तींवर रू. ८५.४९ कोटी रकमेच्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असल्याकारणाने दि. २२.८.२०१६ रोजी शिवाजी पार्क पोलिस ठाणे, मुंबई येथे एफ.आय. आर. क्र.२६८/१६ दाखल केला आहे.

(३) व (४) शिवाजी पार्क पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत पुढील चौकशी चालू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्हयातील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पासाठी भूसंपादन करताना शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(१३) * ८१५८६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉर प्रकल्पासाठी सुमारे १४ हजार १३७ एकर जमीन संपादित करण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यापूर्वी जिल्हयातील प्रत्येक तालुक्यात एमआयडीसीमार्फत हजारो एकर जमिनी संपादित करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमआयडीसी मार्फत संपादित केलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनी कित्येक वर्षे विनावापर पडून असून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचे अद्यापही पुनर्वसन करण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून दिल्ली-मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉर प्रकल्पासाठी जमिनी संपादित करताना शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे अंशत: खरे आहे.

रायगड जिल्हयातील दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पासाठी १२.०२.२००९ ते २५.०२.२०१२ या कालावधीत २ तालुक्यातील ५ औद्योगिक क्षेत्राकरिता मिळून एकूण-१२१४०.८६९ हे.आर क्षेत्रास म.औ.वि. अधिनियम, १९६१ चे प्रकरण-६ च्या अधिसूचनेनुसार तरतूदी लागू करण्यात आल्या आहेत.

(२) यापूर्वी रायगड जिल्हयातील महाड, माणगांव, रोहा, पनवेल व खालापूर तालुक्यात एमआयडीसी मार्फत जमीन संपादन करण्यात आली असून त्या सर्व ठिकाणी महामंडळाने औद्योगिक वसाहती विकसीत केलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर करिता महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ च्या तरतूदीनुसार भूसंपादनाची कार्यवाही सुरु आहे. शेतकऱ्यांशी वाटाघाटीने दर ठरविण्यात आले असून शेतकऱ्यांच्या संमतीने भूसंपादनाची कार्यवाही उपविभागीय अधिकारी, माणगांव व उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) काळप्रकल्प-२, माणगांव यांचेमार्फत केली जात आहे. भूसंपादन करताना गावठाण, गावठाणालगतची घरे व गावठाणाला लागून असलेली भातशेती वगळून जमीन संपादीत करणे प्रस्तावित आहे. तसेच महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार १५ टक्के विकसित भूखंड प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिला जाणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शिलोडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना अन्नातून झालेल्या विषबाधेबाबत

**(१४) * ८१७३० श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिलोडा (ता.डहाणू, जि.पालघर) येथील ज्ञानमत संस्थेच्या विनाअनुदानित

वसतिगृहातील सुमारे ३० विद्यार्थ्यांना सकाळच्या न्याहारीतून विषबाधा झाल्याची घटना दिनांक ११ फेब्रुवारी, २०१७ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, त्यानुसार संबधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

तथापि, शिलोंडा येथील वसतीगृह हे ज्ञानमाता सदन सोसायटी, तलासरी, जि.पालघर या स्वयंसेवी संस्थेमार्फत सेवाभावी तत्वावर चालविण्यात येत आहे. तसेच आदिवासी विभागाद्वारे अनुदान तत्वावर आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह योजना राबविली जात नाही.
(२), (३) व (४) वसतीगृहात घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने विस्तार अधिकारी (शिक्षण), पंचायत समिती, डहाणू यांनी केलेल्या चौकशीमध्ये खालील बाबी आढळून आलेल्या आहेत :-

- जिल्हा परिषद शाळा, शिलोंडा येथे इ. १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग असून सदर शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या ३७३ विद्यार्थ्यांपैकी ११५ विद्यार्थी हे ज्ञानमाता सदन सोसायटी, तलासरी, जि.पालघर या स्वयंसेवी संस्थेमार्फत सेवाभावी तत्वावर चालविण्यात येत असलेल्या वसतिगृहात राहतात. वसतीगृहातील विद्यार्थ्यांना वसतीगृहात सकाळचा नाश्ता व रात्रीचे जेवण दिले जाते. दुपारचे जेवण शाळेत दिले जाते.
- वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी दि.०९.०२.२०१७ रोजी २२ व दि.१०.०२.२०१७ रोजी २२ विद्यार्थ्यांना सकाळी नाश्ता करून शाळेत आल्यानंतर पोटदुखी, डोकेदुखी, ताप इ. तक्रारी जाणवू लागल्याने त्यांना वसतीगृहाच्या अधिक्षकांनी हॉस्पिटल, वडोली, ता.तलासरी येथे उपचारासाठी पाठविले होते.

-----------------

## राज्यात जात पडताळणीची सुमारे ८० हजार प्रकरणे प्रलंबित असल्याबाबत

**(१५) * ७९३६९ श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जात पडताळणीची सुमारे ८० हजार प्रकरणे प्रलंबित असून विद्यार्थी व शासकीय कर्मचाऱ्यांना जात पाडताळणी अभावी अडचणी येत असल्याने या प्रकरणी लवकर निर्णय होणेबाबतचे निवेदन संस्थापक जागृत नागरिक मंच नागपूर यांनी शासनास दिनांक २ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रलंबित जात प्रमाणपत्र देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) सदर निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(२) विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचा कामाचा व्याप विचारात घेऊन समित्यांचे कामकाज प्रभावीपणे व्हावे, याकरिता दि.२/३/२०१५ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हयासाठी स्वतंत्र समिती कार्यान्वित करण्यात आली आहे व वेळोवेळी विशेष मोहिमा आयोजित करुन प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याची कार्यवाही युध्दपातळीवर करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## नाशिक जिल्हयातील बाजार समित्यांमध्ये कांदा व टॉमेटोला भाव मिळत नसल्याबाबत

**(१६) * ७५१४० श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयातील बाजार समित्यांमध्ये कांद्याची मोठी आवक होत असून कांद्याला किलोमागे किमान ४ रुपये व कमाल साडेसात रुपये भाव जाहिर झाल्याने तसेच टॉमेटोला एक रुपया किलो भाव मिळत असल्याने उत्पादकांचे नुकसान होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथे भाज्यांचे दरही कमी झाले असून दोन ते दहा रुपये दराने त्यांची विक्री होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्यातक्षम डाळिंबाची आवक सुरु झाली असून गेल्या वर्षाच्या तुलनेत निम्मा भाव मिळत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शेतक-यांना उत्पादन खर्च निघणेही अवघड झाल्याने त्यांच्या शेतमालाला शासनाने हमीभाव देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) व (२) नाशिक जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये माहे डिसेंबर, २०१६ मध्ये कांद्याची आवक मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे बाजारभाव कमी झाले होते.

तसेच पिंपळगांव कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये टोमॅटोची मोठ्या प्रमाणात आवक झाली असून एका क्विंटलला सरासरी दर रु. ३१० इतका मिळाला आहे.

जिल्ह्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये विक्रीस आलेल्या भाज्यांची विक्री सरासरी रुपये १० दराने झालेली आहे.

(३) नाही.

(४) केंद्रशासनाकडून धान्य,कडधान्य व तेलबिया यासाठी दरवर्षी किमान आधारभूत किंमती जाहिर केल्या जातात व त्या सर्व राज्यांना लागू असतात.

फळे व भाजीपाला या नाशवंत शेतमालासाठी किमान आधारभूत किंमती जाहीर केल्या जात नाहीत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबत

**(१७) * ८१३३१ प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सहकारी सूतगिरण्यांना अर्थसहाय्य देण्याबाबतचा निर्णय शासनाने दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच उक्त निर्णयानुसार किती सूतगिरण्यांना कोणत्या निकषांनुसार किती अर्थसहाय्य देण्यात येणार आहे,
(४) सदर निर्णयाची अंमलबजावणी केव्हापासून करण्यात येणार आहे ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२) व (३) हे खरे नाही. तथापि सहकारी सूतगिरण्या सूरळीत चालाव्यात तसेच आर्थिक अडचणीतून बाहेर याव्यात याकरीता सूतगिरण्यांनी प्रति चाती रु.३०००/- याप्रमाणे वित्तीय संस्थेकडून /रा.स.वि.नि. कडून त्यांचे स्तरावर ५ वर्ष मुदतीसाठी कर्ज घ्यावे व सदर ५ वर्षाचे कमाल १२% पर्यंतचे व्याज शासन भरेल, तसेच शासनाकडून सहकारी सूतगिरण्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या शासकीय भागभांडवलावर प्राप्त होणारे व्याज शासकीय भागभांडवलात समायोजित (Interest Capitalization) करण्यात येऊ नये तसेच यापूर्वी समायोजित करण्यात आलेले व्याज शासकीय भागभांडवल स्वरुपात परत करण्यात यावे याबाबत दि.११.०१.२०१७ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.
(४) शासन निर्णयाच्या दिनांकापासून.

-----------------

## अहमदनगर जिल्हयातील घोसपुरी परिसरात एमआयडीसी व कार्गो विमानतळ प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(१८) * ७६९९९ श्री.विजय औटी (पारनेर), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अहमदनगर जिल्हयातील घोसपुरी परिसरात एमआयडीसी व कार्गो विमानतळ प्रकल्पासाठी मेक इन इंडियाच्या माध्यमातून विविध कंपन्यांशी चर्चा करण्यात आली असून त्याकरिता सुमारे २५ हजार एकर जमीन संपादित करण्यात येणार असल्याचे दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पास मान्यता मिळाल्यास बाधित शेतकऱ्यांना एकरी किती रुपयांचा मोबदला देण्यात येणार आहे,

(३) उक्त प्रकल्पामुळे नगर, श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार असल्याने सदर प्रकल्प कार्यान्वित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१), (२) व (३) मौजे-घोसपुरी ता. नगर व तालुका श्रीगोंदा जिल्हा अहमदनगर येथील जागेची पहाणी करून औद्योगिक क्षेत्राकरीता अहमदनगर-दौंड राज्य महामार्ग तालुका नगर येथील मौजे- देऊळगावसिद्यी, हिवरेझरे, घोसपुरी व सारुळेकासार येथील खाजगी व सरकारी एकूण ४०२६.१४ हे.आर व तालुका श्रीगोंदा येथील मौजे-चिखली व कोरगांव येथील खाजगी व सरकारी १३११.९२ हे.आर अशा दोन औद्योगिक क्षेत्राचे प्राथमिक प्रस्ताव सादर केले आहेत. प्रस्तावाबाबत महामंडळ स्तरावर छाननी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्ह्यात केंद्रीय वखार महामंडळातील तीन कोटीच्या धान्य साठ्याच्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(१९) * ८११६५ श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यासाठी भारतीय खाद्य निगमने केंद्रीय वखार महामंडळाला धान्य साठा करणेचे काम दिले असून याकरीता बडनेरलगतच्या दाभा व रेणूका वेअर हाऊसचे गोदाम भाडयाने घेवून तेथे सरकारी धान्य ठेवण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासकीय अधिकाऱ्यांनी संगनमताने उक्त धान्य साठयापैकी तीन कोटी रूपयांच्या धान्य साठ्यांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निर्देशनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रम्हपूरी येथे असलेल्या वखार महामंडळाच्या गोदामामध्ये असलेल्या लाखो रूपयाच्या धान्यामध्येही गैरव्यवहार करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीचे निष्कर्श काय आहेत व त्यानेसार संबधित दोषी व्यक्तींविरूध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीश बापट :** (१) व (२) अमरावती जिल्हयातील भारतीय अन्न महामंडळाने धान्य साठवणुकीचे काम दिलेल्या केंद्रीय वखार महामंडळाच्या बडनेरा येथील गोदामात सुमारे ८१५.६० मे.टन अन्नधान्याची तूट आली असल्याची बाब सन २०१७ मध्ये निदर्शनास आली आहे.याबाबत तपास सुरु असल्याचे केंद्रिय वखार महामंडळाने कळविले आहे.

(३), (४) व (५) चंद्रपूर जिल्हयातील ब्रह्मपुरी येथे असलेल्या महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या गोदामामध्ये सुमारे रु. ५०,३५,१२२/- इतक्या रकमेच्या अन्नधान्याची तुट आली असल्याचे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने कळविले आहे. या प्रकरणी ब्रम्हपूरी वखार केंद्राचे केंद्रप्रमुख श्री.पंकज कांचन जगदाळे यांना दिनांक-०७/०५/२०१६ व श्री.यशवंत भुरे, भांडारपाल यांना दिनांक १५.१०.२०१६ रोजीच्या आदेशान्वये निलंबीत करण्यात आले असून दि. ३.१०.२०१६ रोजी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणांत पुढील तपास सुरु आहे.

-----------------

## हडपसर (जि.पुणे) येथील आदिवासी मुलींच्या वसतिगृहात गैरसोयी असल्याबाबत

**(२०) * ८२२४८ श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हडपसर (जि.पुणे) येथील आदिवासी मुलींच्या वसतिगृहात मुलींना आवश्यक सुविधा मिळत नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वसतिगृहामध्ये खुर्ची, टेबल, झोपण्यासाठी पलंग, अंथरुण इ. ची कमतरता असून हिवाळ्यात अंघोळीसाठी गरम पाण्याची सुविधा नसल्याने बऱ्याच विद्यार्थिनी वारंवार आजारी पडत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच येथील असुविधांबाबत तसेच समस्यांबाबत अनिवासी रेक्टरकडे तक्रार केली असता याबाबत कोठेही वाच्यता करू नये यासाठी रेक्टरकडून विद्यार्थीनींना धमकावले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, रेक्टर आठवड्यातून केवळ २ ते ३ वेळा वसतीगृहाला भेटी देत असून याबाबत गृहपालांकडे तक्रार केली असतानाही याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्याचे निदर्शनास आले असून शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(५) त्यानुसार संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच विद्यार्थिनीसाठी उक्त सुविधा पुरविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हडपसर, जि.पुणे येथे आदिवासी मुलींसाठी ५०० क्षमतेचे वसतीगृह मंजूर असून हडपसर येथील ॲमनोरापार्क व पारिजात कॉलनी येथे दोन स्वतंत्र इमारतीमध्ये प्रत्येकी १०० क्षमतेचे वसतीगृह कार्यरत आहे. यापैकी प्रवेशासाठी वाढीव अर्ज विचारात घेऊन पारिजात कॉलनी येथील वसतिगृह माहे सप्टेंबर, २०१६ पासून नवीन इमारतीमध्ये सुरू करण्यात आलेले असून यामधील मुलींना आवश्यक सुविधा मिळत नसल्याबाबतचे वृत्त ८ जानेवारी, २०१७ रोजीच्या दैनिक पुढारी वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या बातमीद्वारे व याविषयी सदर वसतीगृहातील विद्यार्थीनींनी दि.०७.०२.२०१७ रोजी केलेल्या तक्रारीवरून निदर्शनास आले, हे खरे आहे.

(२) नवीन इमारतीमध्ये प्रवेशित ८८ विद्यार्थीनींना पलंग व गरम पाणी वगळता उर्वरित सोयी सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रकल्प अधिकारी, घोडेगांव यांच्याकडे प्राप्त तक्रारीनुसार चौकशी करण्याकरीता सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) तसेच शिनोली व मंचर येथील मुलींचे वसतीगृहाचे गृहपाल यांच्या संयुक्त समितीने दि.२३.०२.२०१७ रोजी हडपसर पुणे येथील मुलींचे नवीन वसतीगृहास भेट देऊन चौकशी केली आहे. सदर चौकशीमध्ये विद्यार्थीनींना आवश्यक सोयी सुविधा नियमित पुरविण्यात येत असल्याचे तथापि पलंग व गरम पाण्याची सुविधा उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने पलंग पुरवठ्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## घोटी (ता. इगतपुरी,जि. नाशिक) येथील शनैश्वर पतसंस्थेत ३३ लाख रूपयांचा झालेला अपहार

**(२१) * ७४५७१ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील घोटी (ता. इगतपुरी) येथील शनैश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेमध्ये बनावट सोनेतारण कर्जप्रकरणे तयार करुन ३३ लाखांचा अपहार केल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व चौकशीअंती दोषी असलेल्या संबधितांवर शासनाने कोणती करवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय हे खरे आहे,

(२) व (३) शनैश्वर ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे प्रशासक यांनी केलेल्या कागदपत्रांच्या तपासणीमध्ये संस्थेच्या व्यवस्थापकाने दि.१९.०३.२०१३ ते २२.०५.२०१५ या कालवधीमध्ये बनावट कर्ज प्रकरणे तयार करुन रु.३३ लाखांचा अपहार केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यानुसार संस्थेच्या प्रशासकांनी पोलीस स्टेशन घोटी ता. इगतपुरी येथे गु. नं. १३३/२०१६, दि. ०२.०७.२०१६ अन्वये गुन्हा नोंदविला आहे व संबंधित व्यवस्थापकास अटक करण्यात आलेली आहे.

संस्थेस झालेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी श्री. एस.टी. शिंदे, लेखापरिक्षक (जंगल कामगार), नाशिक यांची दि. ०९.०२.२०१७ रोजीच्या आदेशान्वये कलम ८८ अन्वये चौकशी करण्यासाठी प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणुन नेमणुक करण्यात आली असून पुढील चौकशीचे कामकाज सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नागपूर शहरातील बजाजनगर येथील व्यावसायिक प्रशिक्षण व विवेकानंद महाविद्यालयातील संस्था चालकांनी शिष्यवृत्तीत केलेला गैरव्यवहार**

**(२२) * ७९९७५ श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), श्री.कृष्णा गजबे (आरमोरी), श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील बजाजनगर येथील व्यावसायिक प्रशिक्षण व विवेकानंद महाविद्यालयातील संस्था चालकांनी बोगस विद्यार्थी दाखवून शिष्यवृत्तीचे लाखो रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) अंशत: खरे आहे, या बाबत संबंधित संस्थेविरुध्द बजाजनगर पोलीस स्टेशन नागपूर येथे दिनांक ३.१.२०१७ रोजी गुन्हा र.नं.३/२०१७ दाखल झाला आहे.

(२), (३) व (४) याबाबत पोलीस तपास चालू आहे.

-----------------

**तलासरी (जि. पालघर) येथे आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय आदिवासी मुलींच्या वसतिगृहातील विविध गैरसोयी व समस्यांबाबत**

**(२३) * ७८६४९ श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण),श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) येथे आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय आदिवासी मुलींच्या वसतीगृहातील दोनशे विद्यार्थिनींनी विविध गैरसोई व समस्यांबाबत तसेच अधिक्षिकेच्या मनमानी कारभाराबाबत तहसीलदारांच्या कार्यालयात आंदोलन करून निवेदन दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधीक्षिका वसतीगृहात राहात नाहीत, तसेच शैक्षणिक वर्ष संपत आले तरी अजून विद्यार्थीनींना पुस्तके देण्यात आली नाहीत, पाच महिन्यांचा निर्वाह भत्ता प्रलंबित असून बंद टिव्ही, फोन, संगणक, खेळाच्या साहित्याचा अभाव व निकृष्ट दर्जाचे भोजन देण्यात येत आहे तसेच आजारी पडल्यास रुग्णालयात नेले जात नाही इत्यादी समस्या डहाणू आदिवासी विकास प्रकल्पांच्या सहायक प्रकल्प अधिकारी यांच्यासमोर विद्यार्थिनीनी मांडल्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त गैरसोयीची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, सदर चौकशीअंती वसतिगृह अधीक्षिकेवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच वसतिगृहात उक्त सोईसुविधा तातडीने पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) हे खरे आहे.

(२) आदिवासी मुलींचे शासकीय वसतीगृह, तलासरी येथील विद्यार्थीनींनी वसतीगृहातील अपुऱ्या सोयी सुविधांबाबतच्या समस्या सहायक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प कार्यालय, डहाणू यांच्यापुढे मांडल्या, हे खरे आहे.

(३) प्रकल्प कार्यालय, डहाणू येथील सहाय्यक प्रकल्प अधिकारी (प्रशासन) व आदिवासी विकास निरीक्षक यांनी तलासरी येथील मुलींच्या दोन्ही वसतीगृहास भेट देऊन वसतीगृहातील मुली व गृहपाल यांच्यासोबत संयुक्तपणे चर्चा केली. यासंदर्भात केलेल्या चौकशीमध्ये गृहपाल श्रीमती भाले या वसतीगृहात न राहता घरून ये-जा करत असल्याचे तसेच विद्यार्थीनींचा २ महिन्याचा निर्वाह भत्ता प्रलंबित असल्याचे त्याचप्रमाणे तांत्रिक बिघाड झाल्या कारणाने टिव्ही बंद असल्याचे निदर्शनास आले. मात्र भोजनाचा दर्जा सुधारण्याबाबत गृहपाल यांनी भोजनठेकेदारास दिलेल्या सूचनेनुसार भोजनात सुधारणा झालेली आहे व आजारी विद्यार्थीनींना स्वत: गृहपाल गाडीतून दवाखान्यात घेऊन उपचार करतात, असे आढळून आले.

(४) व (५) चौकशीत आढळून आलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने संबंधित गृहपालाकडून खुलासा मागविण्यात आला आहे. प्राप्त खुलाशानुसार आवश्यक कारवाई करण्यात येत आहे.

-----------------

**कोल्हापूर जिल्ह्यातील आश्रमशाळा, बालसुधारगृह आणि निरिक्षणगृहात मुलांच्या पालनपोषणाकरिता मिळणाऱ्या अनुदानात वाढ करण्याबाबत**

**(२४) * ८१८८२ श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात शासन अनुदानीत आश्रमशाळा, बालसुधारगृह आणि निरिक्षणगृहात एकूण २ हजार २२५ मुले असून या मुलांच्या पालनपोषणाकरिता शासनाकडून मिळणारे अनुदान अत्यंत तुटपुंजे असल्याने त्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा देता येत नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे. सद्य:स्थितीत राज्यातील आश्रमशाळा, बालगृहे, निवासी शाळा इ. मधील प्रवेशितांना दरमहा दरडोई रु.९००/- इतके परिपोषण अनुदान देण्यात येते. सदर परिपोषण अनुदानात सुधारणा करण्याबाबत शिफारशी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगटाची स्थापना करण्यात आली असून, परिपोषण अनुदानात सुधारणा करण्याची बाब शासनस्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

**औरंगाबाद महापालिकेला रमाई आवास योजनेतंर्गत प्राप्त निधीतील केवळ २० कोटी ८० लाख रुपये खर्च झाल्याबाबत**

**(२५) * ८२०५४ श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद महापालिकेला रमाई आवास योजनेसाठी सुमारे ५१ कोटी २० लाख रुपयांचा निधी येऊनही आतापर्यंत यातील फक्त २० कोटी ८० लाख रुपयेच खर्च झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, औरंगाबाद शहरातील दारिद्र्यरेषेखालील मंजूर ३ हजार १७१ घरकुलांपैकी केवळ ४८५ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ६८४ घरकुलांची कामे प्रगतीपथावर असल्याने एवढा मोठा निधी येऊनही महापालिकेतील अधिकारी उदासीन असल्याचे निदर्शनास येते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी आहे पण रमाई आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी नसल्याने वंचित घटकांना घरकूले उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) हे अंशत: खरे आहे.

सन २०१० ते २०१४ या कालावधीत औरंगाबाद महानगरपालिकेला रु. ५१.२८ कोटी निधी देण्यात आला आहे. सदर प्रकल्पावर आजपर्यंत २१.७० कोटी एवढा खर्च झालेला आहे.
(२), (३) व (४) औरंगाबाद महानगरपालिकेकडून ३१७१ लाभार्थ्यांची रमाई आवास घरकुल योजनांतर्गत निवड करण्यात आली आहे. त्यापैकी ५०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले असून ७१६ घरकुलांचे काम प्रगतीपथावर आहे. निवड झालेल्या लाभार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यास तांत्रिक अडचणी उद्‍भवत आहेत. सदर अडचणी दूर करण्यासाठी आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## बुलढाणा कृषि उत्पन्न बाजार समितीने स्वमालकीची जागा मान्यता न घेता विकल्याबाबत

**(२६) * ८००४५ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा कृषि उत्पन्न बाजार समितीने स्वमालकीची जागा खाजगी विकासकांना देऊन गैरव्यवहार केल्याची तक्रार सन २०१६ मध्ये वा त्या दरम्यान शासनास प्राप्त झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१), (२), (३) व (४) बुलडाणा कृषी उत्पन्न बाजार समितीने त्यांच्या बुलडाणा मुख्य यार्डातील तसेच उपबाजार धाड व दुधा येथील समितीच्या मालकीची रिकामी जागा विविध तीन संस्थांना ३० वर्षासाठी करार करुन लिजवर दिलेली आहे. तथापि पणन अधिनियमातील तरतुदीप्रमाणे यासाठी बाजार समितीने सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेतलेली नसल्यामुळे सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे दि. २८.२.२०१७ रोजी निर्देश देण्यात आले आहेत.

-----------------

**पनवेल (जि.रायगड) येथील रसायनी परिसरातील भाडेपट्टा कराराने घेतलेल्या जमिनीपैकी वापरात नसलेली शेतजमिन मूळ मालकास परत करण्याबाबत**

**(२७) * ७९३८५ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र शासनाने पनवेल (जि.रायगड) येथील रसायनी परिसरातील केमिकल प्रकल्पासाठी १४ गावांतील शेतक-यांकडून १९६० साली दीर्घमुदतीच्या भाडेपट्टा कराराने घेतलेल्या १६०० एकर शेतजमीन विक्रीस प्रकल्पग्रस्त शेतकरी संघटना आणि कामगारांनी विरोध दर्शविला असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतक-यांनी वापरात नसलेली शेतजमीन मूळ मालकास परत देणेसाठी एचओसी कंपनीवर दिनांक २३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(४) असल्यास, तदनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी एचओसी कंपनी परिसरात मोर्चा काढण्यात आला होता.

(२) हे अंशत: खरे आहे. दि.२४ डिसेंबर २०१६ रोजी एचओसी कंपनी परिसरात मोर्चा काढण्यात आला होता.

(३) मा.सर्वोच्च न्यायालयाने संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या जमिनीच्या संदर्भात दिवाणी अपील क्र.३६२८/१९९७ (विशेष अनुमती याचिका क्र.२६०४/१९९२) केरळ राज्य विरुद्ध एम. भास्करन पिल्लाई व इतर या प्रकरणात दि.५.५.१९९७ रोजी न्यायनिर्णय दिलेला आहे. त्यानुसार शासन निर्णय क्र.एलक्युएन-३०/२०००/प्र.क्र.६७/अ-२, दि.१२/०३/२००४ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयात संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या जमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर अशा जमिनीची केवळ जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी, परंतु ती मूळ भूधारकाला परत करू नये असे नमूद आहे. त्यामुळे मूळ शेतकऱ्यांना वापरात नसलेली संपादित जमीन परत देणे शक्य होणार नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**आंबेगाव तालुक्यातील (जि. पुणे) तीन आदिवासी आश्रमशाळेत स्त्री अधिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत**

**(२८) * ७७२५७ श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबेगाव तालुक्यातील (जि.पुणे) पाच आदिवासी आश्रमशाळांपैकी तीन आदिवासी आश्रमशाळेत स्त्री अधिक्षकांची पदे मंजूर असूनही गेल्या दोन वर्षांपासून ती रिक्त आहेत व यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ जानेवारी, २०१७ रोजी मा.आदिवासी विकास मंत्र्यांकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तीन शाळांवर अद्यापही स्त्री अधिक्षिकेची नेमणूक केली नसल्याने मुलींच्या संरक्षणाची जबाबदारी स्त्री शिक्षीकेवर सोपविण्यात आली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील नमूद स्त्री अधिक्षकेची पदे रिक्त असण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच सदर पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विष्णु सवरा :** (१) होय, सदर निवेदन दि.३१/०१/२०१७ रोजी प्राप्त झाले आहे.

स्त्री अधिक्षकांची पदभरती करण्याबाबतचे नियुक्ती प्राधिकारी अपर आयुक्त, आदिवासी विकास हे असल्यामुळे सदर निवेदन अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना पाठविण्यात येवून याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(२) ज्या आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षकांची पदे रिक्त आहेत तेथे महिला शिक्षक संवर्गातील कर्मचा-यांकडे स्त्री अधिक्षक पदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात सोपविण्यात आलेला आहे.

(३) सा.प्र.वि., शा.नि.दि.२५.०७.२०१२ मधील तरतुदीनुसार ठाणे विभागातील स्त्री अधिक्षक संवर्गातील ४ पदांसाठी दि.१८.०२.२०१४ रोजी जाहिरात देण्यात आली होती. तथापि, सदर भरतीप्रक्रियेत पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे सदर पदे रिक्त आहेत.

(४) आदिवासी विकास विभागाच्या दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयान्वये स्त्री अधिक्षिका संवर्गातील २१० रिक्त पदे सरळसेवेने भरण्यास मंजुरी दिलेली आहे.

सदर २१० रिक्त पदांचे अपर आयुक्त निहाय वाटप करून, स्त्री अधिक्षिका संवर्गातील ६० पदे सरळसेवेने भरण्यास दि.२२.१२.२०१६ अन्वये आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना कळविले आहे.

सदर रिक्त पदे भरण्याबाबत अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्यामार्फत कार्यवाही सुरू आहे.

-----------------

## राज्यातील डी प्लस झोनमधील यंत्रमाग ग्राहकांना वीज दर सवलत मिळण्याबाबत

**(२९) * ७५३७४ श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पॉवरलुम धारकांकरीता प्रत्येक महिन्याला वीज दर कमी-जास्त होत असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविक पॉवरलुम उदयोग बाजारातील मंदीमुळे अडचणीत सापडला असताना वीज दरात होत असलेल्या कमी-जास्त प्रमाणामुळे कपड्यांची किंमत निर्धारित करण्यास अडचणी येत आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यामुळे डी प्लस झोनकरिता वीज दर सवलत लागू करण्यात यावी तसेच एफ.ए.सी. (विज समायोजन शुल्क) मध्ये ४० टक्के ऐवजी १०० टक्के सुट देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) राज्यातील लघुदाब यंत्रमाग धारकांना नोव्हेंबर, २०१५ पासून शासन निर्णय दिनांक ७.११.२०१५ अन्वये अनुक्रमे २७ अश्वशक्ती खालील व २७ अश्वशक्ती वरील ग्राहकांना अनुक्रमे रु. २.७७ प्रती युनिट व रु. ४.२२ प्रति युनिट एवढी वीजदरात सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे दोन्ही वर्गवारीतील ग्राहकांना रु. २.६६ प्रति युनिट असा वीजदर आकारण्यात येत होता. परंतु दि. १ नोव्हेंबर, २०१६ पासून महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने नवीन वीजदर लागू केले असल्यामुळे वीजदरातील सवलतीची रक्कम वजा जाता आता ग्राहकांना अनुक्रमे रु. २.७४ प्रती युनिट व रु. २.६३ प्रति युनिट असा आकारण्यात येत आहे.

(३) राज्यातील सर्व D+ झोन सहीत लघुदाब यंत्रमाग धारकांना शासन निर्णय दि. ७.११.२०१५ अन्वये २७ अश्वशक्ती खालील यंत्रमाग धारकांना शासनातर्फे २२ पैसे प्रति युनिट व २७ अश्वशक्ती वरील यंत्रमाग धारकांना ३० पैसे प्रति युनिट इतकी इंधन समायोजन आकारात सवलत देण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासन निर्देशानुसार पुर्नगठन करून शेतक-यांना कर्जवाटप न केल्याबाबत

**(३०) * ७९८९६ डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासन निर्देशानुसार शेतक-यांना पुर्नगठन करून कर्जवाटप न केल्याने जिल्ह्यातील २० हजारांहून अधिक शेतक-यांना खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावे लागल्याची तक्रार स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री, सहकार व पणन यांचेकडे दिनांक ११ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासन निर्देशांचे पालन न केल्याबद्दल त्यांचेवर कारवाई करण्याची मागणी सदर लोकप्रतिनिधींनी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने सदर प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) होय, अंशतः खरे आहे. अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेने शासन निर्णयानुसार २०५२६ शेतकऱ्यांना पुनर्गठन न केल्यामुळे अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकेवर प्रशासक नेमण्याबाबत मा.श्री.अनिल बोंडे, विधानसभा सदस्य यांनी दिनांक ४/८/२०१६ रोजी मा.मंत्री (सहकार) यांच्याकडे तक्रार केली होती.

(२) होय, हे खरे आहे.

(३) अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, अमरावती यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(१) अन्वये दिनांक ३०/९/२०१६ रोजी निर्देश दिले आहेत. सदर निर्देशांचे पालन न केल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७९(३) अन्वये दिनांक ३/१२/२०१६ रोजी विभागीय सहनिबंधक, अमरावती यांनी बँकेला आदेश देवुन बँकेच्या संचालकांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ (CA) अनुसार कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीसच्या विरोधात मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर येथे रिट याचिका क्र.७०३८/२०१६

दाखल करण्यात आली. सदर याचिकेतील अपिलार्थी यांचे विरोधात मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांनी दिनांक २०/१२/२०१६ रोजी आदेश पारीत केले आहेत. तथापि, १५ दिवसांकरीता त्याचा परिणाम लागू होणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे. तद्नंतर अपिलार्थी यांनी उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांचेसमोर विभागीय सहनिबंधक, अमरावती यांच्या कलम ७९(३) अन्वये दिलेल्या दिनांक ३/१२/२०१६ रोजीच्या नोटीसविरूध्द रिट याचिका क्र.१२/२०१७ दाखल केली असता मा.न्यायालयाने दिनांक ३०/१२/२०१६ रोजी विभागीय सहनिबंधक यांच्या दिनांक ३/१२/२०१६ च्या नोटीसीला अंतरिम स्थगिती दिली असून सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) उंबरविरा ठाकूरवाडीतील घरांना विद्‌युत जोडणी देण्याबाबत

**(३१) * ८०६५५ श्री.नितेश राणे (कणकवली), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खालापूर तालुक्यातील (जि.रायगड) बीड खुर्द ग्रामपंचायत हद्दीतील उंबरविरा ठाकूरवाडी येथे आजमितीस वीज पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू गावासाठी त्वरीत वीज पुरवठा करण्यात यावा याकरिता सन २००८ साली पाठविलेला सविस्तर प्रस्ताव सातत्याने पाठपुरावा करूनही मंजूरी अभावी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खालापूर पंचायत समितीचे पदाधिकारी, जिल्हापरिषद पदाधिकारी व ग्रामपंचायत बीड खुर्दचे सदस्य यांच्या नेतृत्वाखाली उंबरविरा, ठाकूरवाडी ग्रामस्थांनी खालापूरचे तहसिलदार श्री.राजेंद्र चव्हाण यांना माहे, जानेवारी २०१७ मध्ये तसेच तत्पुर्वी मागील १ वर्षापासून लेखी निवेदन देवून उंबरविरा, ठाकूरवाडीला विनाविलंब विद्‌युत पुरवठा करण्याबाबत मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उंबरविरा, ठाकूरवाडी येथे विनाविलंब विद्‌युत पुरवठा जोडणी देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४)

अपारंपारीक ऊर्जा स्त्रोताव्दारे सदरचे काम करण्याचे सन २००८ साली प्रस्तावित केले होते. परंतु वनविभागाच्या हरकतीमुळे काम करता आले नव्हते. आता दि. ०७/०६/२०१६ रोजी वन विभागाने सदर कामास मंजुरी दिली आहे. सदरचे काम जिल्हा नियोजन योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात करण्यात येणार असून जिल्हा नियोजन समितीकडून निधी उपलब्ध होताच सदरचे काम करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हयातील कुपवाड-मिरज औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक सांडपाणी जमिनीत मुरवले जात असल्याबाबत

**(३२) * ८१३५३ श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील कुपवाड-मिरज औद्योगिक वसाहतीमधील रासायनिक सांडपाणी जमिनीत मुरवले जात असल्याने आजूबाजूच्या गावांमधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्लँट औद्योगिक विकास महामंडळाकडून बंद करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, हा प्रकल्प करताना प्रकल्प अहवालामध्ये यातील प्रक्रिया झालेले सांडपाणी शेतीसाठी अथवा परिसरामध्ये न सोडता ते एमआयडीसीनेच उचलावे असे स्पष्टपणे नमुद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महामंडळाने हा प्रकल्प चालविण्यासाठी दिलेल्या कंपन्या अस्तित्वात नाहीत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत चौकशी करून संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) तसेच हा प्रकल्प त्वरीत कार्यान्वित करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई :** (१) हे खरे नाही.

(२) या औद्योगिक वसाहतीमधील सीईटीपी प्लान्ट हा अद्यापपावेतो कार्यान्वित झालेला नाही.

(३) होय, एमआयडीसीने प्रकल्पातून प्रक्रिया केलेले सांडपाणी HRTS पध्दतीने वृक्षारोपणासाठी वापरण्याचे नियोजित आहे. तथापि सरपंच, ग्रामपंचायत सावळी व इतर ग्रामस्थ यांनी दिवाणी न्यायालयात रे. दि. मु. नं. २८८/२०१४ दावा दाखल केला असून मा. कोर्टाच्या निर्णयामुळे HRTS चे काम स्थगित करण्यात आले असून महामंडळाने मुंबई, उच्च न्यायालय येथे रिट पिटीशन नं. २४२६/२०१० नुसार दावा दाखल केला असून तो न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रकल्प चालविण्यासाठी दिलेल्या दोन्ही कंपन्या मे. सुयोग मिटकॉन कंन्सॉर्शियम पुणे व मे. कृष्णा व्हॅली एन्व्हॉरोटेक प्रा. लि. या अस्तित्वात आहेत.

(५) ग्रामस्थांनी न्यायालयात सन २००४ साली दावा दाखल केल्यामुळे प्रकल्प अद्याप कार्यान्वित झाला नाही. त्यामुळे कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(६) सध्या प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

----------------

## कोल्हापूर परिमंडळातील वीज ग्राहकांकडे ५२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याबाबत

**(३३) * ८०९८३ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर परिमंडळातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांची संख्या दिनांक ३१ मार्च, २०१६ पूर्वी ७९ हजार ६२७ एवढी असून त्यांच्याकडे ५२ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे नुकतेच माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एवढ्या मोठ्या प्रमाणात थकबाकी असण्यामागील कारणे काय आहेत,

(३) असल्यास, शासनाने उक्त बाबीची चौकशी केली आहे काय तसेच ग्राहकांकडून थकबाकी वसुल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

कोल्हापूर परिमंडळातील कायमस्वरुपी वीजपुरवठा खंडीत झालेल्या ग्राहकांची संख्या दिनांक ३१ मार्च, २०१६ पूर्वी ८५ हजार ४१६ एवढी असून त्यांच्याकडे रु. ५३.१० कोटी इतकी थकबाकी आहे.

(२) ग्राहकांनी वीज बिले न भरल्यामुळे थकबाकी वाढली आहे.

(३) महावितरण कंपनीमार्फत संबंधित वीज ग्राहकांची वीज बिलाची थकीत रक्कम वसुल करण्याबाबत स्थळ पाहणी, वसुली मोहिम व लोक अदालतद्वारे प्रकरणे निकाली काढण्यात येतात. तसेच कायमस्वरुपी बंद ग्राहकांसाठी व्याज व दंड माफीची "नवप्रकाश योजना २०१६-१७" माहे नोव्हेंबर, २०१६ ते एप्रिल, २०१७ पर्यंत चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील गैरव्यवहार प्रकरणी संचालकांच्या मालमत्ता जप्त करण्याबाबत

**(३४) * ७७६९९ श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेतील, १५७ कोटींच्या गैरव्यवहार प्रकरणी संचालकांच्या मालमत्ता जप्त करण्याचे आदेश राज्य शासनाने दिनांक १३ जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त संचालकांच्या मालमत्ता जप्त करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच याबाबत सद्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अकोले तालुक्यातील (जि. अहमदनगर) गर्दणी येथील आदिवासी मुलींच्या आश्रमशाळेतील गैरसोयींबाबत

**(३५) * ७६९४८ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोले तालुक्यातील (जि. अहमदनगर) गर्दणी येथील आदिवासी मुलींच्या आश्रमशाळेच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या विशेष पथकाने केलेल्या तपासणीत शाळेच्या पटावर ४६ विद्यार्थिनी दाखविण्यात आल्या असून प्रत्यक्षात फक्त ३५ विद्यार्थिनी उपस्थित असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, या तपासणीत उक्त आश्रमशाळेमध्ये शौचालयाची कमतरता, अशुध्द पाणी, वीजेचा अपुरा पुरवठा, निकृष्ट आहार इत्यादी समस्या असून मुलींच्या सुरक्षेबाबत उपाययोजना केल्या नसल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) त्यानुसार आश्रमशाळेत उक्त सुविधा न पुरविणाऱ्या संबंधितांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे तसेच उक्त सुविधा पुरविण्याबाबत व मुलींच्या सुरक्षेची उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा :** (१) शासकीय आश्रमशाळा गर्दणी, ता. अकोले, जि. अहमदनगर या शासकीय आश्रमशाळेची महिला अधिकाऱ्यांच्या पथकाने दि.२२.११.२०१६ रोजी तपासणी केली असता शाळेत ५५ मुले व ४६ मुली असे एकूण १०१ विद्यार्थी पटावर असून त्यापैकी ३६ मुले व ३८ मुली प्रत्यक्षात हजर होत्या.

(२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळा, गर्दणी सद्यस्थितीत भाड्याच्या इमारतीत सुरू आहे. सदर आश्रमशाळेत इयत्ता १ ली ते ७ वी चे वर्ग असून ६१ निवासी व ४० अनिवासी असे एकूण १०१ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इयत्ता १ ली ते ७ वीच्या वर्गासाठी ५ वर्ग खोल्या आहेत. निवासासाठी स्वतंत्र व्यवस्था नसून ३ वर्ग खोल्यामध्ये मुलांची व २ वर्ग खोल्यामध्ये मुलींच्या निवासाची व्यवस्था

करण्यात आलेली आहे. तसेच १ स्वंयपाकगृह व १ कोठीगृह उपलब्ध आहे. सदर इमारतीत मुलींसाठी १ व मुलांसाठी १ स्नानगृह आहे. मुलींसाठी २ व मुलांसाठी २ शौचालय आहेत.

विद्यार्थ्यांना शुध्द पाणी मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

शाळेसाठी स्वतंत्र विद्युत जोडणी असून शाळा परिसर, वर्ग खोल्या, स्वंयपाकगृह, स्नानगृह शौचालय इत्यादी ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच तेथील विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे सकस भोजन व अल्पोपहार दिला जातो.

सदर आश्रमशाळेतील स्त्री अधीक्षिकेचे पद रिक्त असून सद्या या पदाचा पदभार प्राथमिक शिक्षिकेकडे सोपविण्यात आलेला असून त्या मुलीसोबत रात्री निवासास असतात. तसेच विद्यार्थीनीच्या सुरक्षितेसाठी वर्ग ४ ची महिला कर्मचारी मुलीसोबत वास्तव्यास असते. तसेच चौकीदाराचे पद भरण्यात आले आहे. मुलीच्या निवासस्थानामध्ये धोक्याची घंटा बसविण्यात आलेली आहे. तसेच सर्व खोल्यांना कडी कोयंडे, खिडक्यांना काचा बसविण्यात आलेल्या असून मुलींच्या सुरक्षेची पुरेपुर काळजी घेण्यात येत आहे.

सदर आश्रमशाळेची पट संख्या कमी असल्याने, सदर शाळा भाड्याच्या इमारतीत असल्याने व सदर शाळेच्या इमारत बांधकामासाठी गावात जमीन उपलब्ध होत नसल्याने सदर शाळा शासकीय आश्रमशाळा, सावरचोळ, ता. संगमनेर येथे स्थलांतरीत करण्याचे प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लखमापुर (ता. दिंडोरी, जि. नाशिक) येथील अल्फा सॉल्व्हंट कंपनीमध्ये अमली पदार्थांचे कच्चे रसायन आढळून आल्याबाबत

**(३६) * ७६७३६ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लखमापुर (ता.दिंडोरी, जि.नाशिक) येथील अल्फा सॉल्व्हंट कंपनीवर दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईत अमली पदार्थांचे रसायन आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु अमली रसायनांचा वापर नेमका कशासाठी केला जात होता तसेच अमली रसायन वापरण्याचा परवाना या कंपनीने घेतला आहे काय, याबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार संबंधित कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही. तथापि सदर ठिकाणी क्लोरल हायड्रेट तयार करण्यासाठी लागणारी रसायने मिळाली आहेत.

(२) सदर रसायनांचा वापर क्लोरल हायड्रेट तयार करण्यासाठी केला जात असल्याचे चौकशीमध्ये आढळून आले आहे. या प्रकरणी अधिक चौकशी करण्यात येत आहे.

(३) व (४) या गुन्हयात सात आरोपींविरुध्द विष कायदा, १९१९ चे कलम २ व ६, महाराष्ट्र विष नियमावली १९७२ चे नियम ३ व १२ चे उल्लंघन झाल्यामुळे आणि महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ८१, ८३, ८६ व ९० अन्वये गुन्हा रजि. क्र.५११/१६ दि.३१.१२.२०१६ रोजी नोंद केला आहे.

-----------------

## चेंबूर (मुंबई) येथील सामाजिक न्याय विभाग संचलित मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना जेवणात पाल सापडल्याबाबत

**(३७) * ८२०१७ श्री.मनोहर भोईर (उरण), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.विजय औटी (पारनेर), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील सामाजिक न्याय विभाग संचलित मागासवर्गीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दिनांक १२ फेब्रुवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास जेवणात पाल सापडली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) चौकशीनुसार संबधित कंत्राटदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, जेवणात पाल असल्याचे आढळून आले आहे.

(३) सदर प्रकरणी संबंधित कंत्राटदाराचा ठेका रद्द करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अहमदनगर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या भरारी पथकाने अवैध मद्य प्रकरणी १४४ जणांविरुध्द गुन्हे दाखल केल्याबाबत**

**(३८) * ७७०५३ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर जिल्ह्यात राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या श्रीरामपूर येथील भरारी पथकाने गोवा व अरुणाचल प्रदेशातून विक्रीसाठी आलेल्या १४ लाख २९ हजार ९७३ रुपयांच्या अवैध दारु विक्री प्रकरणी १४४ जणांविरुध्द गुन्हे दाखल केले आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यापैकी ४८ जणांना अटक करुन त्यांच्याकडून २२ लाखांचा मुद्दे माल जप्त करण्यात आल्याची माहिती दिनांक २७ डिसेंबर, २०१६ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करून दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे. निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, भरारी पथक क्र.१ यांनी मौजे किन्ही शिवार, ता.पारनेर, जि.अहमदनगर येथे दि.१३/१२/२०१६ रोजी अवैध मद्याची वाहतुक करीत असताना विना क्रमांकाची होंडा सिटी कार पकडली असून त्यामध्ये विदेशी मद्य (दमण निर्मित) ५१०.६४ लि. जप्त केले आहे. सदर गुन्ह्यात जप्त केलेल्या एकूण मुद्देमालाची किंमत रु.१४,६२,१४०/- इतकी आहे. संबंधिताविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गु.र.क्र.३८९/२०१६ दि.१३/१२/२०१६ नोंदविलेला आहे व एका आरोपीस अटक केली असून एक आरोपी फरार आहे.

अहमदनगर जिल्हयात दि.१डिसेंबर, २०१६ ते दि.२५.१२.२०१६ या कालवधीत एकूण १४८ गुन्हे नोंदविले आहेत व त्यात ४८ इसमांना अटक करण्यात आली होती. या सर्व गुन्हयात जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची अंदाजे किंमत रु.२३,५९,०७४/- इतकी आहे

(३) सदर गुन्हयासंदर्भात पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.